# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक. :
(२०)२५६०१२६४
(२०)२५६०१२६५
ई.मेल: pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

---

संदर्भ क्र.:पुवि/निववि/१२५३ दिनांक : २६/०८/२०१३

प्रति,

१. मा. प्राचार्य, सर्व संबधित संलग्न महाविद्यालये.
२. मा. संचालक, सर्व संबधित मान्यताप्राप्त संस्था.

**विषय:**— महाविद्यालय गुणवत्ता सुधार कार्यक्रम (२०१३—१४) अंतर्गत खेळाच्या साहित्याचे ऑन लाईन पध्दतीने प्रस्ताव स्विकारणे करणेबाबत...

महोदय/महोदया,

गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत खेळाच्या साहित्यासाठी विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त महाविद्यालये/संस्थांकडून सन २०१३—२०१४ या आर्थिक वर्षासाठी ऑनलाईन पध्द्तीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर ऑनलाईन अर्ज **दिनांक २८ ऑगस्ट २०१३ रोजी सकाळी १०.००** वाजल्या पासुन विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील त्याची लिंक पुढील प्रमाणे **(Home page -- BCUD Online—College login & passward—Main menu--QIP) दिनांक १२ सप्टेंबर २०१३ रोजी सायंकाळी ६.०० वाजल्या** नंतर विद्यापीठाच्या संकेत स्थळावरचे ऑनलाईन अर्ज स्विकारणे बंद करण्यात येईल. याची सर्व महाविद्यालय/संस्थांनी नोंद घ्यावी.

खेळाच्या साहित्याच्या प्रस्तावा **सोबत आवश्यकती कागद पत्रे जोडून** प्रस्तावाची एक प्रत दिनांक २०/०९/२०१३ पर्यंत नियोजन व विकास विभागात जमा करावी. महाविद्यालये/संस्थांनी ऑनलाईन प्रस्तावाची प्रत अंतिम तारखेपर्यत नियोजन व विकास विभागास जमा न केल्यास संबंधीत महाविद्यालये/संस्थाच्या प्रस्तावाचा विचार करता येणार नाही याची कृपया नोंद द्यावी.

महाविद्यालये/संस्थांनी यापूर्वी मिळालेल्या खेळाच्या साहित्यासाठी पुन्हा प्रस्ताव सादर करु नयेत.

महाविद्यालये/संस्थांनी २०१२—१३ साठी अर्थसहाय्य मिळाले असेल अशा महाविद्यालये/संस्थांनी २०१४—१५ मध्ये खेळाच्या साहित्यासाठी प्रस्ताव सादर करावेत.

**प्रस्तावा सोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रांची यादी:**

१) मान्यताप्राप्त प्राचार्य/डायरेक्टर, प्रभारी मान्यताप्राप्त प्रभारी प्राचार्य/डायरेक्टर याचे विद्यापीठ मान्यतेचे पत्र.

२) मान्यताप्राप्त शारिरीक शिक्षण संचालक (फिजिकल डायरेक्टर) यांचे विद्यापीठ मान्यतेचे पत्र.

२) २०१२—२०१३ चा वार्षिक अहवाल या विभागाला दिल्याची पोहोच प्रत .

३) सन २०१३—१४ या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यापीठ निधी (प्रोरेटा) **स्पोर्टस्, विद्यार्थी कल्याण मंडळ, शैक्षणिक प्रवेश विभाग (संगणक शुल्क व विकासनिधी)** विद्यापीठास दिल्याची पोहोच प्रत किंवा प्रोरेटाचा धनाकर्ष पोस्टाने पाठवला असल्यास पोस्टाची पावती जोडावी.

४) ऑक्टोबर २०१२ मध्ये सलग्नीकरणाचे पैसे भरलेल्या चलनाची झेरॉक्स प्रत.

५) खेळात सहभागी झाल्याचे (३ व्यक्तीगत व २ सांघीक खेळाचे) स्पोर्ट झोनल ऑफिसरच्या सही व शिक्क्याचे प्रमाणपत्र.

कळावे.

उपकुलसचिव
नियोजन व विकास